# प्राथमिक शिक्षण संचालनालय
# शालेय पोषण आहार योजना

- **योजनेस सुरवात दिनांक 22 नोव्हेंबर, 1995**.

  शालेय पोषण आहार ही केंद्र पुरस्कृत योजना असून राज्यात सदर योजना 22 नोव्हेंबर, 1995 पासून राबविण्यात येत आहे. सुरुवातीला या योजनेअंतर्गत इयत्ता 1 ली ते 5 वी च्या विद्यार्थ्यांना प्रति महा 3 किलो प्रमाणे मोफत तांदूळ देण्यात येत होता. (Take Home Supplement) सन 2001 मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना कोरडा तांदूळ न देता शाळेमध्ये अन्न शिजवून द्यावे असे आदेश दिले व त्यानुसार  सन 2002 पासून या योजनेचे स्वरुप बदलून घरी तांदूळ देण्याऐवजी विद्यार्थ्यांना शाळेतच शिजविलेला आहार देण्यात येतो. सन 2008 मध्ये या योजनेचा विस्तार करण्यात आला असून इयत्ता 6 वी ते 8 वी च्या विद्यार्थ्यांना सुध्दा या योजनेचा लाभ देण्यात येतो.

- **योजनेची ठळक वैशिष्टे**

  * प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरणे.
  * प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढविणे.
  * शाळेतील विद्यार्थ्यांची गळती थांबविणे.
  * भेदभाव नष्ट करणे.
  * विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे.

- राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशतः अनुदानित शाळा, मदरसा /मक्तबा, राष्ट्रीय बालकामगार शाळेतील विदयार्थी (NCLP शाळेतील विदयार्थ्यांना उच्च प्राथमिक नुसार लाभ) इ. ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या **इयत्ता 1 ली ते 8 वी** पर्यंतच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार योजनेचा लाभ दिला जातो.

- **योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दिला जाणारा लाभ -**

| अ.क्र. | इयत्ता | अन्न शिजविणे करिता प्रति विद्यार्थी अनुज्ञेय रक्कम, ( 1 जुलै, 2014 पासुन) | उष्मांक | प्रथिने (ग्रॅम) | तांदूळ (ग्रॅम) | डाळी (ग्रॅम) | पालेभाज्या (ग्रॅम) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** |
| 1 | 1 ली ते 5 वी | रु. 3.86 | 450 | 12 ग्रॅम | 100 ग्रॅम | 20 ग्रॅम | 50 ग्रॅम |
| 2 | 6 वी ते 8 वी | रु. 5.78 | 700 | 20 ग्रॅम | 150 ग्रॅम | 30 ग्रॅम | 75 ग्रॅम |

- **MDM Scheme Norms**

| Item | Central Share | State Share |
|---|---|---|
| Rice | 100 % | NIL |
| Cooking Cost | 60% | 40% |
| Transportation from FCI to School @Rs.120/Qtls | Rs.75/ Qtls<br>62.5 % | Rs.45/Qtls<br>37.5% |
| Management & Monitoring Cost | 100% | NIL |
| Kitchen Devices | 100% | NIL |
| Kitchen cum Store | 75% | 25% |

- **योजनेच्या अंमलबजावणीची कार्यपध्दती -**

शालेय पोषण आहार योजनेच्या **अंमलबजावणीची** जबाबदारी **शाळा व्यवस्थापन समितीवर** सोपविण्यात आली असून, **खाजगी शाळांबाबत संबंधित शाळा व्यवस्थापनाकडून शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी केली जाते.** शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत आहार शिजविण्याचे काम महिला बचत गट, गरजू महिला तसेच NGO यांचे कडून केले जाते.

- या योजनेसाठी लागणारा तांदूळ केंद्र शासनाकडून मोफत प्राप्त होतो. या योजनाअंतर्गत भारतीय अन्न महामंडळाच्या गोडाऊनमधून प्राप्त होणाऱ्या तांदूळाची शाळेपर्यंत वाहतूक करण्यासाठी केंद्र शासनाकडून वाहतूक खर्च प्राप्त होतो.
- केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या मोफत तांदुळापासून आहार बनविण्याकरीता Cooking Cost या शिर्षाखाली शासनाकडून अनुदान प्राप्त होते. Cooking Cost यामध्ये इतर धान्यादी वस्तू, आहार तयार करण्याकरीता लागणारे इंधन तसेच पालेभाज्या इ. खर्चाचा समावेश असतो.

- 18/06/2009 च्या शासन निर्णयानुसार संचालनालयाचे स्तरावरून, तांदूळ वाहतूक व ग्रामीण भागात धान्यादि मालाचे (उदा.कडधान्य, डाळी, मीठ, मिरची, तेल इ.) शाळास्तरापर्यंत पुरवठयाकरिता ई - निविदा मागवून कंत्राटदाराची नेमणूक करण्यात येते.
- सद्यस्थितीत कार्यरत पुरवठेदार
  1) महाराष्ट्र स्टेट को.ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन - 5 शैक्षणिक विभाग (पुणे, नाशिक, औरंगाबाद, लातुर, मुंबई)
  2) महाराष्ट्र स्टेट को.ऑप. मार्केटिंग फेडरेशन - 3 शैक्षणिक विभाग (कोल्हापूर, अमरावती, नागपूर)

**कामाचा तपशील :-**

ग्रामीण भागात - तांदूळ वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा शाळांपर्यंत करणे.
शहरी भागात - शाळांनपर्यंत तांदूळ वाहतूक करणे.

- सद्यस्थितीत कार्यरत पुरवठेदाराची मुदत दिनांक 10 जुन 2015 रोजी संपलेली असून शासनाचे दिनांक 15/06/2015, दिनांक 14/09/2015, दिनांक 11/12/2015 व दिनांक 02/02/2016 रोजीच्या पत्रान्वये सदर पुरवठेदारांना वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली असून ती दिनांक 29/02/2016 पर्यंत होती.
- शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शाळांपर्यंत तांदळाची वाहतूक व ग्रामीण भागात धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय खरेदी समिती दिनांक 28 डिसेंबर 2015 रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली आहे. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय खरेदी समितीमार्फत ई-निविदा प्रकिया करण्यात यावी. यासाठी निविदा प्रक्रियेचे वेळापत्रक समितीने ठरवावे याप्रमाणे शासनाच्या दिनांक 28 डिसेंबर 2015 रोजीच्या पत्रान्वये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत तांदुळाची वाहतूक व धान्यादि मालाचा पुरवठा करण्यासाठी जिल्हा निहाय निविदा प्रक्रिया राबविण्याकरीता शासनाने मंजुरी दिली आहे. संचालनालय स्तरावरुन निविदा प्रक्रिया राबवून सदर निविदा प्रक्रियेत L1 आलेल्या निविदाधारकांकडून दर कमी करुन घेवून प्रस्ताव शासनास सादर करण्यात आले आहते.
- शहरी भागात तयार आहार पुरवठयासाठी स्वरस्याच्या अभिव्यक्तीसाठी (Expression of interest) स्वयंसेवी संस्था/सेवाभावी संस्था /महिला मंडळे /बचत गट यांचेकडून अर्ज मागवून केद्रीय स्वयंपाकगृह प्रणालीचा वापर करुन तयार आहाराचा पुरवठा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.
- **स्वयंपाकी व मदतनीस**

दिनांक 2 फेब्रुवारी 2011 च्या शासन निर्णयानुसार शालेय पोषण आहार योजनेमध्ये अन्न शिजवण्याचे काम करण्यासाठी **स्वयंपाकी व मदतनीस** या कामासाठी स्वतंत्रपणे मानधन अदा करण्यास मान्यता दिली आहे .

स्वयंपाकी व मदतनीस यांना दरमहा केंद्र हिस्सा रु.750/- व राज्य हिस्सा रु.250/- एकूण रु. 1000/- याप्रमाणे दहा महिन्यांचे मानधन अदा करण्यात येते.

सन 2014-15 मध्ये कार्यरत स्वयंपाकी व मदतनीस संख्या - **165235**

**स्वयंपाकी मदतनीस यांनी खालील कामे करणे.**

1) अन्न शिजविण्याचे काम करणे.

2) तांदूळ व धान्यादी मालाची साफसफाई करणे.

3) शाळेमध्ये विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप जेवणाच्या जागेवर करणे तसेच पाणी पुरविणे.

4) भोजनानंतर जागेची ताटांची साफसफाई करणे, शाळा व परिसर स्वच्छ ठेवणे.

**शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत खालील बाबींसाठी जिल्हयांना तरतूद वितरीत करण्यात येते.**

1. इंधन आणि भाजीपाला -
2. धान्यादी मालाची खरेदी -
3. स्वयंपाकी तथा मदतनीस मानधन -
4. डाटा एन्ट्री ऑपरेटर मानधन

**निधी वितरण पध्दती :-**

केंद्र शासनाकडून 75% व राज्य शासनाकडून 25% प्रमाणे निधी शालेय शिक्षण विभागास प्राप्त होते. त्यानंतर सदरचे अनुदान प्राथमिक शिक्षण संचालनालयाला वर्ग करण्यात येते. PAB नुसार मंजुर विद्यार्थीसंख्या व कार्यदिन यानुसार सर्व जिल्हा परिषदा व उपसंचालक मुंबई यांनाआवश्यक अनुदान वर्ग केले जाते.

शिक्षण विभाग ( प्राथमिक ) यांचेकडून प्राप्त निधी सर्व जिल्हयांच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना BDS प्रणालीवर उपलब्ध करून दिला जातो. सदरचा निधी जिल्हयांना प्राप्त होताच BDS प्रणालीव्दारे देयके तयार करून जिल्हयाच्या कोषागारांना सादर केली जातात. आणि कोषागारातून सदरची रक्कम जिल्हा परिषदेच्या खात्यावर वर्ग केली जाते. त्यानंतर सदरचा निधी जिल्हा तसेच तालुका स्तरावर शिक्षणाधिकारी यांचेमार्फत वितरित केला जातो. तालुकास्तरावरून केंद्रप्रमुखांमार्फत शाळांना निधी वितरित करण्यात येते.